महाराष्ट्र राज्य
कला शिक्षण मंडळ, मुंबई
सर ज. जी. कला शाळा आवार, डॉ. डी. एन. रोड, फोर्ट,
मुंबई- ४०० ००१. फोन. नं. ०२२ २५१७२१६९/७०
Web: www.msbae.ac.in I Email: director.msbae@gmail.com

Maharashtra State
Board of Art Education, Mumbai
Sir J. J. School of Art compound, Dr. D. N. Road,
Fort, Mumbai- 400 001. Ph. No. 022 25172169 / 70
Web: www.msbae.ac.in I Email: director.msbae@gmail.com

क्रमांक: कशिमं-२०२६/पाच/रेखाकला परीक्षा/मानधन/**E-3394318** दिनांक:- स्वाक्षरी खालील

**परिपत्रक (Web-Circular)**

प्रति,
प्राचार्य/मुख्याध्यापक/केंद्र प्रमुख,
शासकीय रेखाकला परीक्षा-२०२५
सर्व केंद्र शाळा

**विषय :- शासकीय रेखाकला (एलिमेंटरी व इंटरमिजिएट) परीक्षा २०२५ साठी नेमण्यात आलेल्या केंद्रांना केंद्र खर्चाची मानधन देयके ऑनलाईन भरणेबाबत.**

महाराष्ट्र राज्य कला शिक्षक मंडळाकडून शासकीय रेखाकला परीक्षा-२०२५ चे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेकरीता कला संचालनालय/मंडळाने शाळांना परीक्षा केंद्र म्हणून मान्यता दिली होती. त्या परीक्षा केंद्रांवर शासकीय रेखाकला परीक्षा-२०२५ घेण्यात आल्या आहेत. सदर परीक्षा केंद्रांना परीक्षेसाठीचा केंद्र खर्च देण्याकरीता ऑनलाईन पद्धतीने देयकासंबंधीची माहिती मागविण्यात येत आहे.

सर्व परीक्षा केंद्रांनी देयकासंबंधीची माहिती ऑनलाईन पद्धतीने मंडळाच्या **msbae.ac.in** या संकेतस्थळावर Drawing Grade Exam या मेनूमध्ये Drawing Grade Exam Remuneration-2025 या टॅबवर दि. ०४.०९.२०२६ पर्यंत भरावी. यामध्ये सदर परीक्षेत प्रत्यक्ष काम केलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे जसे केंद्र प्रमुख, कला शिक्षक, पर्यवेक्षक, लिपिक, शिपाई इत्यादीच्या नावांची माहिती ऑनलाईन भरावी.

सर्व केंद्रांना विद्यार्थी नोंदणी करण्यासाठी मंडळाकडून दिलेल्या Login User ID व Password चा वापर करून सदर माहिती भरावयाची आहे. तसेच ज्या केंद्रांनी यापूर्वी ऑनलाईन पद्धतीने शासकीय रेखाकला परीक्षा-२०२५ च्या मानधनासाठी माहिती भरली होती, त्यांनी पुन्हा माहिती भरणे आवश्यक आहे.

माहिती भरतांना कांही तांत्रिक अडचण असल्यास Support साठी 8355870544/ 8668545322 यावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा.

जी परीक्षा केंद्रे मानधनासाठी देयकाची माहिती ऑनलाईन दि. ०४.०९.२०२६ पर्यंत भरणार नाहीत, अश्या केंद्रांच्या मानधनाबाबत मंडळाकडून कार्यवाही केली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

Digitally signed by
Vinod Rangnath Dandge
Date: 19-08-2026
17:59:27

(विनोद दांडगे)
संचालक,
महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ,मुंबई

प्रत-

१. मा. कला संचालक, कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. निवड नस्ती.